# सफर ऐतिहासिक किल्ल्यांची

संभाजी पाटील



परी प्रकाशन



**सफर ऐतिहासिक किल्ल्यांची**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १००/-



# अनुक्रमणिका


## किल्ले पन्हाळगड —— ५

१. इतिहासाचा अमूल्य ठेवा किल्ले पन्हाळगड ..... ७

## निवडक वैशिष्ट्यपूर्ण किल्ले —— ३१

१. यादवांच्या इतिहासाचा साक्षीदार – किल्ले देवगिरी (दौलताबाद) ..... ३३
२. एक अभेद्य जलदुग – सिंधूदुर्ग ..... ४५
३. इतिहासकालीन आरमारी हालचालीचे केंद्र – विजयदुर्ग ..... ५५

## जावळीच्या खोऱ्यातील किल्ले —— ६१

१. जावळीचे खोरे आणि चंद्रराव मोरे ..... ६३
२. दुर्गांचा दुर्ग – किल्ले रायगड ..... ६६
३. शिवरायांची दूरदृष्टी – प्रतापगड ..... ७६
४. जावळीच्या खोऱ्यातील महत्त्वपूर्ण किल्ला – मकरंदगड ..... ८३

## पुणे परिसरातील किल्ले —— ८७

१. स्वराज्याचे तोरण – किल्ले तोरणा ..... ८९
२. स्वराज्याची पहिली राजधानी – किल्ले राजगड ..... ९४
३. पुणे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा गड – सिंहगड ..... १०२
४. मुरारबाजीच्या पराक्रमाचा साक्षीदार – किल्ले पुरंदर ..... ११०

## कोल्हापूर जिल्ह्यातील उपेक्षित किल्ले —— ११५

१. किल्ले पारगड ..... ११७
२. किल्ले सामानगड ..... १२३
३. किल्ले विशाळगड ..... १२९
४. किल्ले भुदरगड ..... १३७

# किल्ले पन्हाळगड



इतिहासाचा अमूल्य ठेवा


# किल्ले पन्हाळगड

## पन्हाळगडाची ओळख आणि ऐतिहासिक वारसा :

महाराष्ट्रातील प्रत्येक किल्ला हा शिवरायांच्या पराक्रमाचा आणि आठवणीचा साक्षीदार आहे. शिवरायांनी ज्या गडावर पाऊल ठेवले तो गड अमर झाला. शिवरायांच्या स्मृतीही अमर राहिल्या. शिवरायांच्या आयुष्यात काही रोमांचकारी प्रसंग ज्या काही गडांवर घडले, त्यातलाच एक गड म्हणजे किल्ले पन्हाळगड ! बाजीप्रभूंच्या आत्मबलिदानाने पावन झालेला गड म्हणजे किल्ले पन्हाळगड ! मरणाला कवटाळणाऱ्या, स्वराज्यासाठी आणि शिवरायांसाठी स्वत:चे बलिदान देणाऱ्या शिवा काशिदच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला किल्ले पन्हाळगड ! मराठ्यांच्या भावी छत्रपतींना–संभाजीराजेंना छत्रपती शिवरायांच्या आदेशानुसार काही दिवस नजरकैदेत राहावे लागले ते याच पन्हाळगडावर ! त्या पन्हाळगडाचा इतिहास आपण जाणून घेणार आहोत.

महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक जिल्ह्यांपैकी इतिहासाचा वारसा लाभलेला जिल्हा म्हणजे कोल्हापूर जिल्हा होय. महाराणी ताराबाईंनी राजघराण्याची गादी निर्माण केली त्या कोल्हापूर जिल्ह्यातील महत्त्वाचा गड म्हणजे 'किल्ले पन्हाळगड' होय.

सह्याद्री पर्वताच्या रांगेत अगदी दक्षिणेकडे कोल्हापुरातून वायव्य दिशेला सुमारे २० किमी अंतरावर पन्हाळगड वसलेला आहे. निसर्गरम्य हवा, वळणावळणाचा रस्ता, हिरवीगार झाडी आणि इतिहासाच्या साक्षीदार असलेल्या अनेक ऐतिहासिक वास्तूंनी नटलेला पन्हाळगड समुद्रसपाटीपासून ३१२७ फूट उंचीवर आहे.



पन्हाळगड

पन्हाळगड बांधण्यापूर्वी त्या पठाराला ब्रह्मगिरी पर्वत म्हणून ओळखले जायचे. निसर्गरम्य वातावरण, गर्द राई, आल्हाददायक हवा असे वातावरण ब्रह्मगिरीवर असल्यामुळे अनेक ऋषिमुनी या गडावर तपश्चर्या करण्यासाठी येत. पन्हाळगडाच्या (ब्रह्मगिरीच्या) दक्षिण, ईशान्य बाजूला अगदी १०–१५ किमी अंतरावर वाडी रत्नागिरी गाव आहे. याच गावात दख्खनचा राजा 'जोतिबा' चे मंदिर आहे. चैत्र पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते. त्यानिमित्त पन्हाळगडही पर्यटकांनी आणि भाविकांनी फुलून गेले असतो.

फार पूर्वी या ब्रह्मगिरीवर म्हणजे आजच्या पन्हाळगडावर पराशर नावाचे ऋषी तपश्चर्या करण्यासाठी आले होते. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी सत्यवतीही होती. ब्रह्मगिरीत त्याकाळी नाग जमातीचे लोक राहत होते. ते पराशर ऋषींना खूप त्रास देऊ लागले. तपश्चर्येत विघ्ने आणू लागले. पराशर ऋषींनी आपल्या तप:सामर्थ्याने सर्वांना शरण येण्यास भाग पाडले. पुढे नाग लोक पराशर ऋषींचे भक्त झाले.

नाग लोक आणि पराशर ऋषी यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. नागांनी तेथे स्थापन केलेल्या लिंगाला 'नागेश' या नावाने आणि त्यांनी उत्पन्न केलेल्या झऱ्याला 'नागझरी' या नावाने प्रसिद्ध पावतील असा पराशर ऋषींनी नागांना वर दिला. नाग लोक खूश झाले. ते भक्तिभावाने पराशर ऋषींची सेवा करू लागले. आजही पन्हाळगडावर 'नागझरी' पाहावयास मिळते.

आज 'पन्हाळगड' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या गडाला प्राचीन काळापासून अनेक नावे प्राप्त झालेली आहेत. हा गड ब्रह्मगिरी, पराशरगड, पद्मालय, पर्णालपर्वत, पनालगड,

पन्हाळादुर्ग इत्यादी अनेक नावांनी ओळखला जात असे. राष्ट्रकूटांच्या काळात या गडाला 'पनाला' असे संबोधले जायचे.

मुस्लिम राजवटीत या गडाचे 'शहानबीं दुर्ग ' असे नाव ठेवण्यात आले. शिवरायांनी हा गड १६५९ साली जिंकून घेतला आणि पुन्हा 'पनालगड' हे जुने नाव कायम केले. इ.स. १८२७ साली पन्हाळगडाला कर्नल वेल्श यांनी भेट दिली होती. त्यांनी पन्हाळगडाला **Watery mountain** (वॉटरी माऊंटन) आणि पावनगडाला **Windy mountain** (विंडी माऊंटन) असे संबोधले.

आज हा गड 'पन्हाळगड' या नावानेच बहुचर्चित आहे.

पन्हाळगडाला सभोवती बंदिस्त तटबंदी आहे. आज ही तटबंदी कित्येक ठिकाणी ढासळलेल्या अवस्थेत आहे, तर कित्येक ठिकाणी आजही ती मजबूत आहे. ही तटबंदी कोणी बांधली, हे निश्चितपणे पुराव्यानिशी सांगता येत नसले तरी वेगवेगळ्या राजवटीत वेगवेगळ्या राजांनी ही बांधली असल्याचे लक्षात येते. इ.स. पूर्व २०० पासून ही तटबंधी बांधली गेली असल्याचे निदर्शनास येते. राष्ट्रकूटांच्या काळात पनालदुर्ग चांगलाच प्रसिद्ध पावला होता.

पन्हाळगडाची मजबूत तटबंदी बांधण्याचे श्रेय शिलाहार घराण्यातील महामंडलेश्वर विक्रमादित्य भोज राजा (दुसरा) याला दिले जाते. त्याने या परिसरात अनेक किल्ले बांधले होते, म्हणूनच त्याला, ''गड उभारणारा महान सत्ताधीश आणि पर्वतांना अंकित करणारा शूर राजा'' असे म्हटले जाते.

या राजा विक्रमादित्य भोज (दुसरा) याने इ.स. ११८७ मध्ये शिलाहार राजघराण्याची राजधानी वाळव्याहून कोल्हापूरला आणली. कोल्हापूरहून लगेच तीन वर्षांतच पन्हाळगडाला आणली. पन्हाळगडावर राजा भोज (दुसरा) याने अनेक वर्षे सत्ता भोगली.

इ.स. १२०९ मध्ये यादव घराण्यातील शूर राजा सिंघन देव या चक्रवर्तीने पन्हाळगड जिंकून घेतला व शिलाहार घराण्याची सत्ता संपुष्टात आणली.

इ.स. १३१८ मध्ये देवगिरीच्या यादव घराण्याची सत्ता अल्लाउद्दीन खिल्जीने संपुष्टात आणली. यादव साम्राज्य नष्ट झाल्यामुळे दक्षिणेत सुलतानशाही फोफावू लागली. इ.स. १४५३ मध्ये बहामनी सुलतानांचा सरदार मलिक अत्तुजार याने पन्हाळगडावर आक्रमण करून राजा शिर्केचा पराभव केला व पन्हाळगड ताब्यात घेतला. किल्ले विशाळगड (खेळणा) ताब्यात घेण्याच्या मनसुब्याने मलिक अत्तुजार याने प्रयत्न चालू ठेवला, पण शिर्क्यांनी त्याच्यासह ७००० सैनिकांची कत्तल करून पन्हाळगड व विशाळगड आपल्या ताब्यात ठेवला.

इ.स. १४६९ मध्ये बहमनी सुलतानाचा पराक्रमी सरदार महम्मद गवान याने पन्हाळगडावर स्वारी केली व तो गड जिंकून आपल्या ताब्यात ठेवला. त्या पाठोपाठ विशाळगड (खेळणा) ही जिंकून आपल्या ताब्यात ठेवला.

इ.स. १५३८ साली बहमनी राजवटीची शकले झाली आणि पन्हाळगड विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात गेला. आदिलशाहीतला अत्यंत महत्त्वपूर्ण किल्ला म्हणून या किल्ल्याकडे पाहिले जात असे. पन्हाळगड आदिलशाहीची उपराजधानी झाली. आदिलशाहीच्या काळात पन्हाळगडावर अनेक नवीन बांधकामे झाली. गड सुशोभित व भक्कम केला. गडावर अनेक बांधकामे केली. बांधकामे केलेल्या इमारतींवर शिलालेख कोरले गेले. आदिलशाहीच्या काळात या गडाचे नाव 'शहानबी दुर्ग' असे ठेवण्यात आले होते. काही आदिलशाही सरदारांमध्ये हिंदू देवदेवतांबद्दल आदर असल्यामुळे पन्हाळगडावर प्राचीन हिंदू मंदिरे शाबूत राहिली.

पन्हाळगडावर आदिलशाहीच्या काळात कलावंतिणीचा सज्जा, तीन दरवाजा, चार दरवाजा, अंधार बाव, धर्म कोठी इत्यादी इमारतींचे बांधकाम केले गेले होते. त्यामुळे पन्हाळगडाच्या वैभवात आणखीन भर पडली होती.

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात सुलतानशाही, निजामशाही आणि आदिलशाही सत्ता आपले अधिपत्य गाजवत होत्या. पन्हाळगड आदिलशाहीच्या ताब्यात होता. छत्रपती शिवरायांनी १० नोव्हेंबर १६५९ रोजी स्वराज्यावर अफझलखानाच्या रूपाने आलेल्या संकटाला तोंड दिले व त्याचा वध केला. आदिलशाही खिळखिळी झाली. शिवरायांनी या संधीचा फायदा घेऊन २८ नोव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळगड आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे शिवरायांची सत्ता अधिक बळकट होण्यास मदत झाली होती.

शिवरायांच्या वाढत्या प्रभावामुळे आदिलशाही चिडली होती. त्यांनी शिवरायांच्या बिमोड करण्यासाठी सिद्दी जोहरला पन्हाळगडावर चाल करण्यास पाठवले. छत्रपती शिवराय त्यावेळी पन्हाळगडावर होते. ३ मार्च १६६० रोजी सिद्दी जोहरने पन्हाळगडाला वेढा दिला आणि शिवराय पन्हाळगडावर अडकले. त्याने चार महिने पन्हाळगडाला वेढा दिला.

शिवरायांनी १२ जुलै १६६० रोजी पौर्णिमेच्या रात्री गनिमी काव्याने सिद्दी जोहरच्या हातावर तुरी देऊन विशाळगडाकडे पलायन केले. यावेळी 'दुसरा शिवाजी' बनून सिद्दी जोहरला भेटायला गेलेल्या शिवा काशीदला वीरमरण आले.

शिवराय विशाळगडाकडे जात असताना वाटेत पांढरपाणी येथे सिद्दी मसउदच्या सैन्याने त्यांना गाठले. त्यावेळी बाजीप्रभूने खिंड लढवून शिवरायांचे प्राण वाचवले. या लढाईत बाजीप्रभूला वीरमरण आले.

औरंगजेबने आपला विश्वासू सरदार मिर्झा राजे जयसिंग याला दक्षिण मोहिमेवर पाठवले आणि १६ जानेवारी १६६० रोजी शिवरायांना पन्हाळगड सोडून पुन्हा विशाळगडाकडे आश्रयासाठी जावे लागले होते.